(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**June -2020**

**ISSUE No-CCXXXV(235)**




**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
Aadhar Social Research &,
Development Training Institute,
Amravati.

**Dr. R.S.Satbhai**
**Executive Editor**
**Local Secretary**
**Adv.B.D.Hambarde** Mahavidyalaya
Ashti

**Guest Editor**

**Dr. S.R.Nimbore**
**Principal**
**Adv.B.D.Hambarde**
Mahavidyalaya Ashti

**Dr. Satish Kadam**
**President,AMIP&**
Head,Dept of History
YCM,Tuljapur

**Dr. Shivraj Bokade**
**Secretary,AMIP&**
Head,Dept of History
YC,Nanded

**The Journal is indexed in:**

**Scientific Journal Impact Factor (SJIF)**

**International Impact Factor Services (IIFS)**

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**JUNE - 2020**

**ISSUE No – CCXXXV ( 235)**

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr. R.S.Satbhai**
**Executive Editor**
**Local Secretary**
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Guest Editor**

**Dr. S.R.Nimbore**
**Principal**
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Dr. Satish Kadam**
**President,AMIP&**
Head,Dept of History
YCM,Tuljapur

**Dr. Shivraj Bokade**
**Secretary,AMIP&**
Head,Dept of History
YC,Nanded

**Aadhar International Publication**

© All rights reserved with the authors & publisher

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Indian nation in the Booker-Winner Indo-Anglian Novelists **Dr. Amit Yograj Kapoor** | 1 |
| 2 | Fiction of Indian Booker Prize Winners: A historical approach **Dr. Abhay Shinde** | 7 |
| 3 | Online shopping ..Its opportunities and challenges. **Mrs. Agrawal Nikita Kachrulal** | 9 |
| 4 | Dealing With Fifth Generation Wireless Technology for Mobile Cloud Computing **Antima Bhimrao Shendge** | 13 |
| 5 | Arun Kolatkar: A Painter of Rustic Maharashtra **Mr. Swapnil Alhat** | 20 |
| 6 | Multidisciplinary practices in Indian Modern Art **Arun Bhagwan Suryawanshi** | 24 |
| 7 | Government Schemes and rural development **Dr. Bhagwan Shankarrao Waghmare** | 28 |
| 8 | Women in Natural Resource Conservation **Ku. Amrapali Eknath Bhiogade** | 32 |
| 9 | A Comparative study of poultry industry and Indian Economy **Dr.Bhosle Vasant Keshav /Mr.Jadhav Ganesh Kantilal** | 38 |
| 10 | Dehvli Language and Culture Of Bhils **Bhushan Arun Hirbhagat** | 43 |
| 11 | Political System in Ancient India - A Study with reference to Neeti Texts **Dr. Bokare Tukaram Eknathrao** | 47 |
| 12 | Medieval monastery tradition and work of Rajur monastery **Prof. Damre Shailja Shankarrao** | 52 |
| 13 | A Study of Perception of Farmers towards Organic Farming in Jabalpur district of Mahakaushal region of Madhya Pradesh **Deepak Agrawal** | 55 |
| 14 | Diabetes **Dr Kalpana Panditrao Korde** | 59 |
| 15 | Dalit Movement after Dr. Babasaheb Amebedkar in India: Challenges, problems & path forward **Dr Mohini Kumari** | 64 |
| 16 | Indian Temples and the Erotic Sculptural Art **Dr. R. R. Pimpalpalle** | 77 |
| 17 | Textile Industry in India **Dr. Sarita Dinkarrao Deshmukh** | 85 |
| 18 | Digital Teaching-Learning: Impact On The Education System **Dr. Alka Dahikar** | 88 |
| 19 | National Security and Climate Change **Dr. Kiran Chakre** | 94 |

| | | |
|---|---|---|
| 214 | राज्यपालांचा हस्तक्षेप आणि संसदीय लोकशाहीस धोका प्रा डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल | 954 |
| 215 | महात्मा ज्योतिबा फुले यांच्या काळातील सामाजिक परीस्थीती प्रा. सुरेश देवशेट्टे | 958 |
| 216 | छ.संभाजी महाराजांच्या काळातील वाकड येथील अप्रकाशित शिलालेख . काळ – इ. सन. १६८१ प्रणव विजयकुमार पाटील | 961 |
| 217 | मानव अधिकाराचे आंतरराष्ट्रीयकरण प्रा.श्रीरंग शामराव लोखंडे. | 965 |
| 218 | राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य प्रा. प्रमोद एस. मेश्राम | 968 |
| 219 | शिक्षणाचे तत्वज्ञान यावर स्वामी विवेकानंद यांचा दृष्टिक्षेप डॉ. विनायक उद्धवराव पाटील | 972 |
| 220 | प्राचीन भारतीय इतिहास का वैज्ञानिक विश्लेषण रू तथ्य तर्क आधारित सूक्ष्माग्राही विवेचन डॉ . शुचि | 977 |
| 221 | शिवराज्याभिषेक : सार्वभौमत्वाचा सोहळा **डॉ. संजय तुकाराम वाघमारे** | 982 |
| 222 | १९७५ ची आणीबाणी आणि वृत्तपत्रे **प्रा.धनंजय राधाकिशन जवळेकर** | 988 |
| 223 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता **प्रा.सुमन लक्ष्मणराव केंद्रे** | 991 |
| 224 | History Of Old Indian Currency **Dr. Mangesh Shirsath** | 993 |
| 225 | Gangavathi region – through the ages: Economic condition **Bajrang bali** | 999 |
| 226 | Relevance Of Mahatma Gandhi's Philosophy In Modern Context **Dr. Vandana M. Mahure** | 1002 |
| 227 | Cultural Effect in Indian History **Dr. Priyanka Kumari** | 1005 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Issue No,235

ISSN : 2278-9308
June 2020

# १९७५ ची आणीबाणी आणि वृत्तपत्रे

प्रा.धनंजय राधाकिशन जवळेकर

इतिहास विभाग,श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा. ता.जामखेड जि.अहमदनगर.

सारांश :- २५ जुन १९७५ रोजी रात्री अंतर्गत आणिबाणी घोषीत करण्यात आली. अंतर्गत आणिबाणीचा परिणाम म्हणून जनतेच्या मूलभूत हक्कावर, स्वातंत्र्यावर गदा आली. उच्चार स्वातंत्र, विचारस्वातंत्र व लिखान स्वतंत्र हिरावून घेण्यात आले. वृत्तपत्रावर प्रसिध्दपूर्व तपासणीचे निर्बंध लादण्यात आले. इंदिरा गांधी व काँग्रेसच्या पक्षाचा विचारधारेला प्रतिकुल असणाऱ्या वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यात आली. विरोधी विचारधारेचा पुरस्कार करणाऱ्या संपादक, पत्रकारांना तुरुंगवास भोगावा लागला. तरीही या काळात काही झुंजार पत्रकारांनी वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी, जनतेच्या मुलभूत स्वातंत्र्यासाठी आणिबाणीविरुध्द आवाज उठवला. व आणिबाणीच्या विरोध दर्शवला पण बहुतांश वृत्तपत्रसृष्टीने मात्र या काळात दमनास विरोध न करता आणिबाणीस मूकसंमती दिली.

**प्रस्तावना :-** जून १९७५ ला आणीबाणी घोषित करण्यामागे विरोधकांची एकजूट व रामलीला मैदानावर श्री जयप्रकाश नारायण यांची सभा तत्कालीन कारण ठरले. किंबहुना १९७१ च्या युध्दानंतर इंदिरा गांधी यांना पक्षांतर्गत स्पर्धक उरला नव्हता, तसेच काँग्रेसपक्षाध्यक्ष श्री देवकांत बरुआ यांनी तर 'इंडिया इज इंदिरा' ही घोषणा केली होती. राज्यसभा व लोकसभेत प्रचंड बहुमत हाताशी होते. त्यामुळे लोकसभा व राज्यसभेत सक्षम विरोधी पक्ष अस्तीत्वात नव्हता. त्यामुळे इंदिरा गांधी या अप्रत्यक्षरित्या देशाच्या सर्वेसर्वा बनल्या होत्या. अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधीजींची लोकसभेची निवडणूक अवैध ठरली व राजकीय घडामोडींना वेग आला. विरोधकांनी एकजूट दाखवत इंदिरा गांधीजींच्या राजीनाम्याची मागणी केली. देशातील बहुसंख्य वर्तमानपत्रांना देखील या मागणीचा पुरस्कार केला. इंदिरा समर्थक म्हणून गणल्या गेलेल्या टाइम्स ऑफ इंडियाने देखील राजीनाम्याची मागणी केली. इतकेच नव्हे तर जयप्रकाश नारायण यांनी सुरु केलेल्या 'संपूर्ण क्रांती' आंदोलनाचे देखील देशातील प्रमुख वृत्तपत्रांनी भरभरुन वार्तांकन केले. त्यामुळे वृत्तपत्रांनीच 'संपूर्ण क्रांती' आंदोलनाला अवाजवी प्रसिध्दी देवून सरकार विरोधी आंदोलनास प्रोत्साहन दिल्याचा आरोप इंदिरा गांधीनी केला. व त्याचा परिणाम म्हणून आणीबाणीत प्रसार माध्यमावर बंधने लादण्यात आली.

**गृहतीके :-** १. १९७५ च्या आणीबाणीच्या कालखंडात वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली.

२. या कालखंडात वृत्तपत्रावरील निर्बंधाचे काही अपवाद वगळता निमूटपणे पालन करण्यात आले.

- **संशोधन पध्दती (तथ्यसंकलन) :-** प्रस्तूत संशोधन लेखासाठी ऐतिहासीक वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला. यासंबधी पूर्वप्रकाशित ग्रंथाचा यासाठी आधार घेण्यात आला...

आणिबाणी जाहीर केली त्याच रात्री वृत्तमानपत्रे प्रसिध्द होवू नयेत म्हणून 'रात्रीच वृत्तपत्र कार्यालयांची विज तोडली गेली.राजधानीवर बातम्यांचा 'ब्लॅक आउट' लादला गेला.'[१] विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक केलेली बातमी बाहेर पडू नये म्हणून हा खटाटोप करण्यात आला. 'या एवढ्या धावपळीने सगळ्याच वृत्रपत्रांची वीज तोडता न आल्यामुळे ऐकदोन वृत्तपत्रे प्रसिध्द झाली. त्यात आदल्यारात्री कोणाला अटक करण्यात आली आहे या संबंधीची बातमी होती.'[२] पण याचा ठपका माहिती व प्रसारण मंत्री आय.के.गुजराल यांच्यावर ठेवण्यात आला व त्यांचे मंत्रीपद काढून घेण्यात आले व त्याजागी श्री संजय गांधीच्या गटाचे श्रीविद्याचरण शुक्ल यांची नेमणुक करण्यात आली. सर्व वृत्तपत्रांना 'सेन्सारशिप' (प्रसिध्दपूर्व तपासणी) लागू करण्यात आली. रोमेश थापर यांनी मेनस्ट्रीम हे त्यांचे नियतकालीक प्रसिध्दपूर्व तपासणीस सादर करण्यापेक्षा बंद केले. त्यावेळी खाजगी दूरचित्रवाहिन्या अस्तित्वात नसल्याने प्रसिध्दी माध्यमे म्हणजे वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, चित्रपट, माहितीपट यांना या निर्बंधाचा फटका बसला. आकाशवाणीवरील वार्तापत्रे प्रसिध्द होण्यापूवी ती संजय गांधींना दाखवण्याचा आदेश माहिती व प्रसारणमंत्री आय.के. गुजराल यांनी न मानल्यामुळे त्यांच्या जागी विद्याचरण शुक्ल यांची माहिती व प्रसारणमंत्री म्हणून नेमणूक झाली होती. इंदिरा गांधीचा वृत्तपत्र स्वातंत्र्यावर आणीबाणीपूर्वीच राग होता. 'बड्या उद्योगांशी संबंधित वृत्तपत्रे आंपल्याला पाठिंबा देत नाहीत व बँकांच्या राष्ट्रीयकरणासारख्या पुरोगामी गोष्टींना विरोध करतात असा त्यांचा

आरोप असे, १९७१ साली वृत्तपत्रांची मालकी काही मूठभरांच्या हाती न राहता विखुरली जावी म्हणून एक विधेयक आणण्याचा प्रयन्त केला पण प्रखर विरोधामुळे तो बारगळला. '[३] १९७४ च्या सुमारास वृत्तपत्रांनी सरकारवर टीकेचे बाण सोडले. तसेच जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनास भरपूर प्रसिध्दी देण्यात आली. त्यामुळे १९७५ ला आणिबाणी जाहीर झाल्यानंतर सहाजिकच वृत्तमान पत्रांना वेसन घालणे इंदिरा गांधींना आवश्यक वाटले. ' Assording to her, the agitation was only in the new papers and once the newspapers were placed under censorship there was no agitation'[४] म्हणजेच वर्तमानपत्रांनी आंदोलनाला अवास्तव प्रसिध्दी देवून मोठे केल्याचा आरोप इंदिरा गांधी करत. जुलै १९७५ मध्ये वृत्तपत्रांच्या भूमिकेबाबत टाइम्स ऑफ इंडियाला मुलाखत देताना श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या 'वृत्तपत्रांवर नियंत्रण लादणे मला मोठे आवडते असे नाही. परंतू दैनिकांनी जणू वस्तूनिष्ठ दृष्टिकोनाचा पूर्णपणे त्याग केला होता. विरीधी आघाडीशी दोस्ती केली व त्यांच्याशी पूर्ण सहकार्य केले होते. एवढेच नव्हे तर देशात विनाशाची व वैफल्याची भावना पसरविण्यात वृत्तपत्रांनी सहकार्य केले.'[५] आणिबाणीमध्ये वृत्तपत्रावर ज्या प्रकारे पूर्व नियंत्रण लादले होते, तसे ब्रिटीश राजवटीत सुध्दा नव्हते. 'आणीबाणीच्या काळात कितीजणांना, कोणाकोणाला अटक केली गेली आणि अटकेत कोठे ठेवले गेले आहे, हे प्रसिध्द करणे हा सुध्दा अपराध होता.'[६] आणीबाणीत पकडल्या गेलेल्या पत्रकारांची संख्या थोडी थोडकी नव्हे तर चक्क २५३ पर्यंत जाऊन पोहचली होती त्यांच्यापैकी ११० जणांना मिसा खाली आणखी ११० जणांना डी.आय.आर खाली आणि इतर ३३ जनांना दुसऱ्या कोणत्या ना कोणत्या तरी कायद्याखाली तुरुंगामध्ये डांबण्यात आले होते. पण त्याची खबरबात छापण्यास वर्तमानपत्रांना बंदी होती. पत्रकंरितेच्या स्वातंत्र्याला दोन पैलू आहेत, एक माहिती गोळा करणे व ती जनतेपर्यंत पोहचवणे हे दोन्ही मार्ग बंद झाले. 'भारत व पंतप्रधान यांना किंवा शासन यंत्रणेला अपायकारक ठरेल अशी कोणतीही बातमी बाहेरुन भारतात येवू शकत नाही. कोणतीही लेख, पत्र वा विधान जर पंतप्रधानांवर शासनावर टीका कारणार असेल तर त्याच प्रकाशन आणीबाणी काळात करता येत नव्हती.'[७] सरकारला अनुकूल भूमिका घेणाऱ्या वृत्रपत्र मालकांची आणि संपादकांची मदत घेवून माहिती व प्रसारणमंत्री विद्याचरण शुक्ल यांनी वृत्रपत्रांसाठी नवी आचारसंहिता तयार करुन घेतली. त्यावर इंडियन एक्सप्रेसचे मुख्य संपादक व्ही.के. नरसिंहन यांनी याबद्दल असा प्रश्न विचारला होता की, 'या नव्या काळात आचारसंहितेत स्वातंत्र्य हा शब्द कुठेही आढळत नाही. हा केवळ एक अपघातच आहे का? या निर्भय पत्रकारितेची किंमत इंडियन एक्सप्रेसला चूकवावी लागली. 'आणीबाणीच्या काळात इंडियन एक्सप्रेस च्या सरकारी जाहीराती बंद झाल्या. एक्सप्रेसचा अंक उशिरा प्रसिध्द व्हावा आणि त्यायोगे सगळया प्रती तशाच पडून रहाव्यात असा सरकारकडून प्रयत्न सुरु झाला. बाहेर जाणारी पार्सल अडविण्यात येवू लागली. '[८] संपादक व्ही.के. नरसिंहन यांचे वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे लिखान सरकारला न रुचणारे होते. त्यामुळे संजय गांधी चे निकटवर्ती कमलनाथ यांनी एक्सप्रेसचे मालक रामनाथ गोयंका यांच्याकडे संपादकांना हटविण्याची शिफारस केली. ती रामनाथ गोयंका यांनी फेटाळली. अशाप्रकारे काही मोजक्या वर्तमानपत्रांनी वृत्तपत्र स्वातंत्र्य जपत सरकारवर टिका चालू ठेवल्याने सरकार नियंत्रीत वृत्तपत्रसंस्था असावी असा आग्रह महंमद युनूस यांनी धरला. 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, युनायटेड न्युज ऑफ इंडिया, समाचार भारती, आणि हिंदुस्थान समाचार यांचा अवतार संपला. या चार वृत्तसंस्थाचे एकत्रीकरण करुन समाचार ही एकच सरकारनियंत्रीत वृत्तसंस्था सुरु करण्यात आली.'[९] आणीबाणीत समाचार या वृत्तसंस्थेद्वारे देशांतर्गत बातम्यांवर नियंत्रण ठेवणे सरकारला सुलभ झाले. आकाशवाणी, दुरदर्शन यांच्याप्रमाणेच समाचार ही मक्तेदारी संस्था माणन्यात आली. कॉंग्रेसच्या खासदार मोहन धारिया यांनी वृत्रपत्रावरील निर्बंधावर पुढील शब्दात नाराजी व्यक्त केली होती. ''आम्ही 'लोकप्रतिनिधी' मासिक चालवतो. त्याच्या अंकाचा मजकूर घेवून हरीभाऊ गद्रे हे प्रसिध्दपूर्व तपासणीला बसलेल्या पोलिस अधिकाऱ्यांकडे गेले. काय मजकुर देणार होतो? भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वचने.. त्याला मज्जाव आणीबाणी विषयक घटनेतील कलमे छापायला देखील बंदी.'[१०] खासदार कृष्णकांत यांनी देखील 'काय गंमत आहे पहा, गांधी-नेहरु-टागोर हा आमचा थोर वैचारिक वारसा, पण आता त्यांच्या वचनावरही सरकारी तपासणीसांची कातरी लागली आहे. हे सर्व किती भयंकर आहे. '[११] अशा शब्दात नाराजी व्यक्त केली होती. स्वातंत्र्य सैनिकांच्या विचारवंतांची मते जर तपासणी अधिकाऱ्यास आक्षेपार्ह वाटले तरी ती छापण्यास प्रतिबंध करण्यात येई. त्यामुळे साहजिकच वृत्तमानपत्रांच्या सेन्सारशिपने किती अतिरेक केला होता. हे समजून येईल

खरे तर प्रशासनावरील अगदी सौम्य टीकेचा बातम्यासुध्दा कापल्या जायच्या उपहासाने परिप्लुत अशा विनोदांना बंदी होती. तामिळ विनोदी व्यंग चित्रकाराने चो रामस्वामीने एका चित्रात इंदिराजी आणि संजय चर्चा करताना दाखवले होते. चित्रांचे शीर्षक होते. 'संविधानातील दुरुस्त्यांबाबत राष्ट्रीय चर्चासत्र' 'एका वाचकाने विचारले इंदिरा गांधी कोण आहेत? त्यावर रामास्वामींनी चित्राच्या खाली उत्तर दिले होते. ' त्या मोतीलाल नेहरुंची नात, जवाहरलाल नेहरुजींची कन्या, आणि संजय गांधीजींच्या आई आहेत हे वाक्य देखील छापण्यास बंदी करण्यात आली.'[१२] माहिती व नोवाणी मंत्रालयाने सेन्सारशिपच्या तरतुदी जुलमीपणाने अमलात आणल्या. सर्वच ठिकाणी सरकारला प्रतिकार नव्हता. लालकृष्ण अडवानी यांनी म्हटले की, वृत्तपत्र व संपादकांना थोडेसे वाकायला सांगितले, तर त्यांनी चक्क रांगायला सुरवात केली. या विधानावरुन वतृपत्र सृष्टीच्या तत्कालीन वर्तवणूकीची कल्पना येते.

**निष्कर्ष :-** इंदिरा गांधींनी देशावर आणीबाणी लादली तेव्हा प्रसार माध्यमांची खुलेआम गळचेपी करण्यात आली. आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांचा ऱ्हास झाला. आणीबाणीत इंदिरा गांधी यांना कमिटेड प्रेस (राजनिष्ठ वृत्तपत्रे) कमिटेड व कमिटेड ज्युडिअशरी हवी होती त्यामुळे अंतर्गत आणीबाणीच्या काळात वर्तमानपत्रावर निर्बंध लादण्यात आले. वृत्तपत्रांनी सरकारविरोधी भूमिका घेतल्याचा ठपका ठेवत राजकिय अस्थिरतेला वृत्तपत्रांना जबाबदार धरण्यात आले. अटक सत्र व दमनचक्रामुळे वृत्तपत्रीय स्वातंत्र्याचा लढा हा मुठभर संपादक व पत्रकारांनी चालू ठेवला. बहूतांश पत्रकारांनी सरकारी बंधने निमुटपणे मान्य केली, व सरकारी प्रचाराचा भाग बनली.

**संदर्भसूची :-**

१. गुप्ते प्रणय, मदर इंडिया, मनोविकास प्रकाशन पुणे, २०१४ प्रथमावृत्ती. पृष्ठ क्र.३९१.

२. वाळिंबे वि.स., इंदिरा गांधी : बंगलोर ते रायबोली, अभिजीत प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती, २०१५ पृष्ठ क्र.२२०. ३. लेले. रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००४ पृष्ठ क्र.११०२.

४. Shah commission of Inquiry, 11 March 1978 Interm Report - I, page No.33, Delhi.

५. नारगोलकर वसंत, अखेर जप्रकाशजी खरे ठरले, मॅजेस्टीक बुकस्टॉल, मुंबई, प्रथमआवृत्ती, १९७७ पृष्ठ क्र.३४.

६. अडवाणी लालकृष्ण, देश माझा, मी देशाचा, अनुवाद, आनंद हर्डीकर, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथमआवृत्ती, २०१९ पृष्ठ क्र.१९९.

७. छागला, एम,सी.,पहाट नक्की उजाडणार आहे, आणीबाणी आणि आम्ही, .(संपा.मेहता उषा), ग्रंथाली प्रकाशन , मुंबई, पहिली आवृत्ती, २००६ पृष्ठ क्र.१६.

८. वाळिंबे, वि.स.इंदिरा गांधी बंगळोर ते रायबरेली, तत्रैव पृष्ठ क्र.२४६.

९. उमा वासुदेव, इंदिरा गांधीजींची दोन रुप, (अनु.माधव मोर्डेकर) अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७७ पृष्ठ क्र.१६७.

१०. साप्तहिक साधना, खासदार मोहन धारीया यांच्याशी बातचीत, १३ सप्टेंबर १९७५, पृष्ठ क्र.०७.

११. साप्तहिक साधना,संपादक प्रकाशन यदुनाथ थत्ते,पुणे, ०४ ऑक्टोंबर १९७५, पृष्ठ क्र.१३.

१२. गुहा रामचंद्र, गांधीनंतरचा भारत, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २०११, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्र.५८३.